जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९१ दिनांक - ०५/०७/२०२३**

## पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

## सिंहगड रोड पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये २३ वी स्थानबध्दतेची कारवाई

पुणे शहरातील सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **महेश उर्फ दाद्या उर्फ रोहित कुंडलिक मोरे,वय-२१ वर्षे,रा.वडगावचा राजा गणपती मंदिरामागे, वडगाव,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह सिंहगड रोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत चाकू, कोयता, सुरा या सारख्या जीवघेण्या हत्यारांसह खुनाचा प्रयत्न, सरकारी नोकरावर हल्ला, जबरी चोरी, दुखापत, दंगा बेकायदेशीर हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०३ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन श्री. रितेश कुमार, **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी नमुद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये अमरावती मध्यवर्ती कारागृह,अमरावती येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.अभय महाजन,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे व श्रीमती.वैशाली चांदगुडे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही २३ वी कारवाई असुन,** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.